पंचायत समिती कोपरगाव येथील शिक्षण विभागाकडील
अधिक्षक शालेय पोषण आहार योजनेचे कामकाज
सोपविणेबाबत.

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ)
आदेश जा.क्र.कार्या.२/आस्था-३/८९५/२०२४
अहमदनगर दि. १६/०५/२०२४

वाचा: -१. या कार्यालयाकडील आदेश क्र.कार्या-२/आस्था-३/६६३/२०२३/३८७०
दि.०१/०८/२०२३
२. म.जि.प.प.स.अधिनियम १९६१ मधील नियम ९५ (२)(क)(तीन)

उपरोक्त विषयान्वये अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती कोपरगाव हे पद रिक्त असल्याने शालेय पोषण आहार योजनेचे अंमलबजावणी व सनियंत्रणाकरिता सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार संदर्भ क्र.१ अन्वये श्री.शिवाजी झरेकर,शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडे सोपविण्यात आला होता.

तथापि श्री.शिवाजी झरेकर शिक्षण विस्तार अधिकारी हे दि.३१/०१/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने सदर अधिकारी यांचेकडील अधिक्षक शालेय पोषण आहार योजनेचा कार्यभार प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीने श्रीम. इंदुमती घट, शि.वि.अ. पं.स. कोपरगाव यांचेकडे या आदेशाद्वारे सोपविणेत येत आहे. तरी श्रीम. इंदुमती घट, शि.वि.अ. पं.स. कोपरगाव यांनी त्यांचेकडील कामकाज सांभाळुन अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती कोपरगाव या पदाचे अतिरिक्त कामकाज सांभाळावे.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202405161600087 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति-

१.श्री.शिवाजी शंकर झरेकर,शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती कोपरगाव
२.श्री. इंदुमती घट, शि.वि.अ. पं.स. कोपरगाव

२/- आपण श्री.शिवाजी शंकर झरेकर,शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील कार्यभार पुढील आदेश होईपर्यत आपलेकडील मुळ कार्यभार सांभाळुन अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती कोपरगाव या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner